Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0012

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII

# सवित्रीबाई फुले यांचा जीवनपरीचय:एक संशोधन लेख

संशोधक – प्रा.प्रिया माणिकराव नेहर
सहसंशोधक – डॉ.संदीप रामभाउ निंभोरकर
पी.आर.पाटील शिक्षण महाविद्यालय तळेगाव (शा.पं),ता.आष्टी जि.वर्धा,महाराष्ट्
priyamnehar@gmail.com., sandeeprnimbhorkar1975@gmail.com
9689834861,9373038866

**सारांश**
शिक्षण हे वाघीनीचे दूध आहे आणि जो ते घेणार तो गुरगुरणार.या आंबेडकराच्या विचारांवर सर्व शिक्षण पध्दती व शिक्षणाचे नवनवीन आयाम उभे राहू पाहत आहे. याच विचाराशी जुडलेले महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार 'विदयेविना मती गेली, मतीविना निती गेली, नितीविणा गती गेली, गतीविणा वित गेले,वित्तविणा शुद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले.या सार्थ विचारावर कृती करत महात्मा ज्योतीबा फुले यांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षीत केले.या प्रस्तुत लेखात सावित्रीबाई फुले यांच्या कार्यावर, जिवनावर त्यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेल्या क्रांतीवर परीचय करत त्यांच्या अजोड कार्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे. जेणेकरुण त्यांच्या कार्याची प्रचिती कष्ट त्यांनी स्त्री शिक्षणासाठी निर्माण केलेला पायंडा हा स्त्रीयांच्या जिवनातील मैलाचा दगड ठरला.या लेखात त्यांनी केलेले समाजकार्य,शिक्षणकार्य यावर प्रकाशज्योत टाकण्याचा प्रयत्न केला गेला. आजही त्यांच्यासारखे प्रतिकूल परिस्थितीतून यश मिळवणा—या स्त्रियांना समाजात मानाच्या स्थानासाठी झगडावे लागते.पण सावित्रीबाई फुले यांच्या शिक्षणाच्या खुल्या केलेल्या दालनामुळे आज स्त्री तग धरु पाहत आहे. किंबहुना उंच आकाशात झेप घेत आहे.या लेखात सावित्रीबाई फुले यांची जिवनविषयक गाथा थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**मुख्य शब्द** : सावित्रीबाई फुले यांचे बालपण,शिक्षण कार्य, समाजकार्य,स्त्रि शिक्षणात भूमिका, ग्रंथसंपदा

**उद्दीष्टे** :

१.सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे.
२.सावित्रीबाई फुले यांच्या समाजकार्याची माहिती घेणे.
३.सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्याची,ग्रंथसंपदाची माहिती घेणे.
४.सावित्रीबाई फुले यांच्या जिवनविषयक माहिती घेणे.

**परीकल्पना** :

**१ सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक कार्यामुळे शिक्षणात आमुलाग्र बदल होतो.**
**२ सावित्रीबाई फुले यांच्या कार्यामुळे स्त्रीयांमध्ये आत्मविश्वास निर्माण होतो.**
**३ सावित्रीबाई फुले यांच्या समाजकार्यामुळे समाजातील चालीरिती,रिवाज बदलण्यास मदत होते.**

**सावित्रीबाई फुले यांचा परिचय** :—

**बालपण**

एकोणिसाव्या शतकात युगायुगापासूनच्या गुलामगिरीच्या बेडया तोडून बहुजन समाजाला जीवनाचा नविन मार्ग दाखवून देणारी युगस्त्री म्हणजे सावित्रीबाई फुले. सावित्रीबाई फुले यांची महाराष्ट्राती

समाजसुधारक म्हणून ओळश आहे. इतकेच नव्हे तर बी.आर आंबेडकर आणि अण्णाभाउ साठे यांच्या आदर्शासह दिलत मागणीचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जातेः सामाजिक बदलाच्या प्रगतीतील त्यांचा मोठा हात असल्याचे मानले जाते.एकोणिसाव्या शतकात प्रख्यात भारतीय समाजसुधारक,शिक्षीका आणि लेखिका सावित्रीबाई फुले यांनी महिलांच्या शिक्षण आणि सक्षमीकरणात महत्वाची भूमिका बजावली. सावित्रीबाई या त्यांच्या काळातील सर्वात कर्तृत्ववान महिला मानल्या जातात. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षीका होत्या. सावित्रीबाई फुले यांनी केवळ समाजाचे शिक्षणच केले नाही तर प्लेगसारख्या साथीच्या काळात लोकोपयोगी कार्य केले. भारतातील पहिल्या शिक्षिका,भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीच्या आद्य आधुनिक विद्रोही मराठी कवयित्री.

त्यांचा जन्म ०३ जानेवारी १८३१रोजी महाराष्ट्रात सातारा जिल्हयाच्या खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे झाला.वडील खंडोजी नेवसे पाटील आई लक्ष्मीबाई आणि सिंधुजी, सखाराम व श्रीपती या तीन भावंडासह सावित्रीबाईचे बालपण आनंदात व्यतीत झाले.खंडुजी नेवसे पाटील हे त्या काळी गावाचे प्रमुख. कुलकर्णी व पाटील यांचा मोठा रबदबा गावात राहत असे. वडीलोपार्जीत श्रीमंतीला कष्टांनी जोड दिल्याने सर्वत्र भरभराट झाली होती. कसदार जमिनी,तुडुंब भरलेल्या विहीरी याशिवाय नदी नालेए ओढयांचे पाण्याचे प्रवाह सर्वच लक्ष्मीच्या संचाराच्या मुक्त खुणा आढळत होत्या. दीनदुबळया अडचणीत सापडलेल्या लोकांसाठी पाटलांचे दार सदैव उघडे असे.आणि हीच शिकवण व बाळकडू लहानपणीच सावित्रीबाईला मिळाली.सोबत त्यांच्या आई लक्ष्मीबाई. पतीने स्विकारलेले पंचक्रोशीतील लोकांचे पालकत्व लक्ष्मीबाईंनी नेटाने जोपासले. नायगाव ज्या ठिकाणी खणकर नेतृत्व करणारी स्त्री जन्मास आली ती पावनभूमी. नायगाव पुणे सातारा मार्गावरीकल एक तीस हजार वस्तीचे छोटेसे खेडेगाव. या गावाच्या दक्षिणेस वडगाव,उत्तरेस पळशी आणि सांगवी आहे. गावचा पश्चिम आणि दक्षिण भाग डोंगराळ आहे. पश्चिमेकडील कळसुबाईचे प्रसिध्द देवस्थान आहे. पौष महिन्यात येथे यात्रा भरते येथील ग्रामदैवत म्हणजे भवानी माता किंवा अंबाबाई. याला एक ऐतिहासिक परंपरा आहे. चैत्रशुध्द तृतीयेला देवीची काठी तुळजापूरला जायला निघते.याचा मोठा मान आहे. त्या दिवशी गावातील लोक देवीला भोगी करतात. सामुदायिक मोठा भंडारा घातला जातो. अशा भाविक वातावरणात सावित्रीबाईंचे बालपण आकारास येत होते.[१](श्रीमती सरोज देशपांडे, स्त्रीभूषण सावित्रीबाई फुले,मुक्तरंग प्रकाशन)

सवित्रीबाई या लहानपणापासून आज्ञाधारक होत्या. कुठलेच काम त्यांना अवघड वाटत नव्हते. माघार घेणे त्यांना आवडत नसे. प्रयत्नांची पराकाष्टा करणे हा तर त्यांचा पिंडच.त्यांच्या मोठया आत्मविश्वासाची प्रचिती लहानपणीच घरच्यांना आली. एकदा सावित्री आपल्या मावशिंच्या घरुन निघाली तेंव्हा ढग तुडूंब भरलेले. क्षणार्धात सर्वत्र पाणीच पाणी. विजा चमकू लागल्या.रस्त्यात कुत्रे ओरडू लागली. झाडे फडफडू लागले. एकदाही मागे वळून न बघता ती पळत सुटली चिंब भिजलेल्या सावित्रीने घर गाठले. मुलीचे हे अफाट धैर्य पाहून आई वडील चकीत झाले. दुसरा एक प्रसंग. गळयातील दाव्याला हिसडे देउन सुटलेला खोंड याला बुध्दीचातुर्याने त्याला सरकी मध्ये ठेवून थांबवले. तिस—या एका प्रसंगात त्यांचा चुलत भाउ रंभाजी याने त्यांच्या शिदोरीतील घेतलेली वाटी त्याच्या पासून हिसकावून घेतली. बालपणीच त्यांच्या या लिलया म्हणजे 'अन्याय घडो कोठेही,चिडून उठू आम्ही । [२](श्रीमती सरोज देशपांडे, स्त्रीभूषण सावित्रीबाई फुले,मुक्तरंग प्रकाशन)

**सावित्रीबाई यांचा विवाह**

पुढे सावित्रीबाई यांचा विवाह १८४० मध्ये ज्योतीराव गोविंदराव फुले यांच्याशी झाला.वडील गोविंदराव, सगुणाबाई मावस बहीण राजाराम भाउ पार्वती जोतीरांवाची वहिनी.गोविंदरावांचे आजोबा

शेटिबा हे बारा बलूतेदारांपैकी एक होते. ते वतनदार चौगेले होते. त्यांचे मूळ नाव गो—हे.पुण्यात ते फुलांचा व्यवसाय करत. ते रोज पेशव्यांना फुले देत. म्हणून कालांतराने त्यांचे नाव फुले असे झाले. गोविंदराव व चिमणाबाई यांचा राजाराम व जोतीराव हे दोन मुले. जोतीराव नउ महिन्याचे असतांनाच त्यांची आई यांनी डोळे मिटले. म्हणून त्यांचा सांभाळ हा सगुणाबाई यांनी केला. सगुणबाई हया चिमणाबाईच्या बहिणीची बालविधवा मुलगी. कनवाळू सगुणाबाई यांना इंग्रज मिशन—यांचा सहवास लाभल्याने स्वातंत्र समता बंधुता व न्याय ही मूल्ये त्यांच्या मनावर कोरली गेली. जोतीबांना शिस्तीचे काटेरी कुंपनही घातले.जोतीराव म्हणजे एक लोकविलक्षण पोरगा.अश्या या विलक्षण जोतीरावांशी सावित्रीबाईचा विवाह झाला. त्यावेळी ९किंवा १० वर्षाच्या असतील.

**शिक्षण**

लग्नाच्या वेळी सावित्रीबाई निरक्षर होत्या. सावित्रीबाई ला शिक्षणाची आवड लहानपणापासूनच होती. एके दिवशी जोतीरावांना सावित्रीबाईच्या हातात पुस्तक दिसले. त्यांची शिक्षणाची इच्छा दिसली. आणि मग सगुणाबाई व सावित्रीबाईचे शिक्षण सुरु झाले.झाडाच्या सावलीत शेतीच्या धुळपाटीत झाडाच्या फांदीच्या लेखणीने त्या दोंघीच्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला.

लग्नानंतर ज्योतीरावांनी त्यांना घरीच शिक्षण दयायला सुरुवात केली.त्यांच्या पुढील शिक्षणाची जबाबदारी ज्योतीरावांनी मित्र सखाराम परांजपे आणि केशव शिवराम भवाळकर यांनी घेतली.या सुमारास पुण्यातील गंजपेठेत छबिलदासाच्या वाडयात मिसेस मिचेल या ख्रिश्चन मिशनरी स्त्रीने 'नॉर्मन स्कूल' सुरु केले. ते म्हणजे आजचे अध्यापक विद्यालय. जोतीरावांनी मिसेस मिचेल यांची भेट घेतली. त्यांना सर्व माहिती सांगितली. व त्यांना सावित्रीबाई व सगुणाबाई यांची परीक्षा घेण्याची विनंती केली. त्यांची सर्व विषयाची लेखी व तोंडी परीक्षा घेतल्या.इ.सन १८४५—४६मध्ये तिस—या व इ.सन १८४६—४७ मध्ये चौथ्या वर्षात दोघींना प्रवेश दिला. हा दोन वर्षाचा कोर्स पूर्ण केला.सावित्रीबाईंनी अहमदनगर येथे फॅरारबाई आणि पुण्यात मिचेलबाई यांच्या नॉर्मल स्कूलमध्ये अध्यापनाचे प्रशिक्षण घेतले.आणि या सगळया कार्यातून आपल्याला मिळाल्या दोन प्रशिक्षित शिक्षीका.

**पहिली स्त्री शिक्षीका**

एखादी व्यक्ती ज्या काळात जन्मास येते व जे कर्तृत्व करते त्यावर तिची माहिती असते. विशेषत: त्या त्या काळाच्या समाजाची दुखणी पाहून नवसमाजाची जडणघडणकरणा—याचे व्रत घेणा—याना सतीचे वाण पत्करुन वाटचाल करावी लागते.'जे जुने ते सोने'का 'जे नवे ते हवे' यातील संघर्ष चालू असताना ज्यामूळे समाज सुखी,संपन्न समर्थ आणि सिध्द होईल अशी विचारसरणी पत्करुन काम करणे हिताचे असते. असे करत असताना परंपराधीन लोकांचा कडवा विरोध होतो.अशा विरोधाला न जुमानता ध्येयाने धुंद होउन स्त्री शिक्षण प्रसाराच्या कामी समर्पण वृत्तीने मग्न राहिलेल्या सावित्रीबाई म्हणजे भारतीय स्वातंत्रदेवीच्या विशाल भालप्रदेशावरील कुंकुमतिलकच होत.[३प्रा.रा.तु.भगत,स्त्री शिक्षणाचे शिल्पकार,चैतन्य प्रकाशन,कोल्हापूर]

जेव्हा स्त्रीला पशूसारखे वागविले जात होते तेव्हा 'स्त्री सुध्दा माणूसच आहे'हा विचार समाजमनात रुजविण्याचे काम सावित्रीबाई करीत होत्या. शिक्षणातून मन परिवर्तन झाले तर समाज परिवर्तन झाले,प्रचंड मानसिक क्रांती झाल्याशिवाय स्त्रियांची दु:खे संपणार नाहीत व स्त्रियांना कर्तबगारीची क्षेत्रे खुली होणार नाहीत व पर्यायाने पुरुषप्रेरणा' म्हणून ज्या स्त्रीकडे पाहिले जाते त्या स्त्री च्या शिक्षणाशिवाय माणुसकी वाढली जाणार नाही.म्हणून हे जाणून त्यांनी आपल्या 'विद्याधन' नावाच्या निबंधात लिहितात की,'आळस,परावलंबन वगैरे दुर्गुण न वाढविण्यास व मनुष्याचे अंगाचे सद्‌गुण

वाढवण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल तर विद्यादान होय.[४प्रा.रा.तु.भगत,स्त्री शिक्षणाचे शिल्पकार,चैतन्य प्रकाशन,कोल्हापूर]

समाजात ज्ञानाचा दिवा लावायचा अज्ञान दूर करायचा.अज्ञान म्हणजे अंधकार,तर ज्ञान म्हणजे प्रकाश. बहुजन समाजाच्या जीवनात आमूलाग्र व विकासात्मक बदल घडवून आणला पाहिजे त्यासाठी त्यांच्या शिक्षणाचे काम हाती घ्यायचे.शिक्षणाचा अंधार दूर करण्यासाठी सावित्रीबाई,जोतीबा,व सगुणाबाई या त्रिकूटांनी हे अवघड काम पार पाडण्याचा निश्चय केला.इ.स. १८४८च्या ऑगस्ट मध्ये पुण्यात भिडयांच्या वाडयात पहिली मुलींची शाळा सुरु झाली.ही शाळा म्हणजे भारतातील नवयुगाचे उगमस्थान मानावे लागेल.आतापर्यतच्या सामाजिक व शैक्षणिक इतिहासाला या कार्याने कलाटणी मिळाली. जोतीराव फुले हे भारतातील पहिले शाळा संस्थापक होते. त्यांच्या त्या शाळेत अध्यापन करणा—या सावित्रीबाई जोतीराव फुले या पहिल्या भारतीय प्रशिक्षित शिक्षिका,पहिल्या मुख्याध्यापिका होत्या. त्यांच्या पहिल्याच दिवशी हजेरीपटावर सहा मुलींची नावे होती.[५(श्रीमती सरोज देशपांडे, स्त्रीभूषण सावित्रीबाई फुले,मुक्तरंग प्रकाशन पृ.क्र.४०)]

आपल्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा होताच जोतीरावांनी जुना गंजपेठेत पुन्हा अस्पृश्यांसाठी शाळा सुरु केली. त्यावेळेला जोतीरावांचे ओळखीचे असलेले गफार काका यांनी शाळेसाठी जागा दिली. तर ती चालविण्यासाठी प्रशिक्षित शिक्षिकाही दिली. ती म्हणजे घटस्फोटीत मुलगी शेख फातीमा बेगम ही होय. ती अत्यंत हुशार होती. तिने मिचेलबाईंच्या नार्मन स्कूलमध्ये सावित्रीबाईंच्या बरोबर शिक्षण घेतले होते.अध्यापनाची तिला विशेष आवड होती. मुस्लिम समाजातील ती पहिली प्रशिक्षित शिक्षिका होय. जोतीरावांनी ३ जुलै १८५१ मध्ये अण्णासाहेब चिपळूणकरांच्या वाडयात मुलींसाठी शाळा सुरु केली. या शाळेत मुलींची संख्या सुरुवातीला ८ होती लवकरच ती ४८ झाली.सावित्रीबाई आता सहशिक्षिका नव्हत्या तर त्या शाळेच्या मुख्याध्यापिका बनल्या होत्या. जोतीरावांप्रमाणेच आता त्यांचाही लौकिक वाढत होता. सर्वत्र दरारा निर्माणहोत होता.सावित्रीबाईंच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील मुलींतही केवळ संख्यात्मक वाढ होत नव्हती तर त्यांचा गुणात्मक दर्जाही वाढत होता.विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासावर भर दिला जात होता.निरोगी व सुदृढ आरोग्याची गुरुकिल्ली म्हणजे शारीरिक शिक्षण. मुलामुलींना शाळेत विविध प्रकाराच्या खेळांचे शिक्षण दिले जात होते. प्रोत्साहनपर बक्षिस दिली जात असे.परंतु मुलामुलींचे सोबत शिकण्याला विरोध होउ लागला. त्यामुळे म्हणून मुली,महिला वेगळया काढून जोती गोविंदराव फुले यांनी १५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठेत एक मुलींची तिसरी शाळा व एक मुलांची शाळा अशा दोन शाळा काढल्या. पुढे त्यांनी देणगीदाराच्या मदतीने अनेक शाळा काढल्या. [६(श्रीमती सरोज देशपांडे, स्त्रीभूषण सावित्रीबाई फुले,मुक्तरंग प्रकाशन पृ.क्र.४५)]

**समाजकार्य**

समाजातील सर्व घटकांतील स्त्रियांसाठी लढता लढता सावित्रीबाई यांनी अनेक समाजकार्य केले. पालकांना जागरुक करण्यासाठी त्यांनी पालक शिक्षक सभांचे आयोजन केले. १८६३ मध्ये जोतीराव आणि सावित्रीबाई या दांम्पत्याच्या कार्यामुळे प्रेरित होउन १८७५ साली पंढरपूरला तेथील दुयम न्यायाधीश लालशंकर अमाशंकर यांनी बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना केली. विधवांची हत्या थांबवण्यासाठी आणि बालमृत्यु थांबवण्यासाठी त्यांनी अनेक सभा घेतल्या. जोतीराव यांना स्वत:ची अपत्य नव्हती. त्यांनी १८७४ मध्ये काशीबाई नावाच्या ब्राम्हण विधवेकडून एक मूल दत्तक घेतले. यशवंतण पुढे तो वैद्यकीय शिक्षण घेउन डॉक्टर बनला.जोतीरावांनी विधवा पुनर्विवाहाला चालना दिली,तर सावित्रीबाई फुले यांनी सतीप्रथा आणि बालविवाह यासारख्या सामाजिक अन्यायाविरुध्द लढा

दिला.२४ सप्टेंबर १८७३ रोजी जोतीरावांनी पुण्यात स्थापन केलेल्या सत्यशोधक समाज या सामाजिक सुधारणा संस्थेशीही संबंधित होते.१८७६ च्या दुष्काळात सावित्रीबाई यांनी मोफत अन्नदान केले.१८९३ साली सासवड येथे झालेल्या सत्यशोधक परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले[7https:marathi.webdunia.com./artic le'marathi-current-news/Savitribai-phule-jjayanti-2024]

१८९७मध्ये जेव्हा बुबोनिक प्लेगच्या तिस—या साथीने नालासोपारा आणि राज्याच्या आसपासचा परिसर गंभीरपणे प्रभावित केले तेव्हा सावित्रीबाई आणि यशवंतरावांनी या आजाराने पीडित रुग्णांवर उपचार करण्यासाठी एक केद्र काढले.रुग्णांची सेवा करीत असतांना त्या आजारी पडल्या आणि १०मार्च १८९७रोजी सावित्रबाई फुले यांचे निधन झाले.

**काव्यसंपदा**

महाराष्ट्रातील एकोणीसावे शतक म्हणजे आठव्या रावबाजीच्या कृष्णकृत्याचा बहरीचा काळ मानला जातो. यावेळी अज्ञान,दास्य आणि लाचारीच्या मिटट काळोखात चाचपडणा—या समाजातील फुले दाम्पत्याचा जन्म म्हणजे कवी बी यांनी आपल्या डंका कवितेत म्हटल आहे,'न कळे कोठून की येतात बंडवाले ते जग हाले स्वगत बोले,तेजाचे तारे तुटले'.या समाजातील जुलमी मतलबी धर्ममार्तंडांची नांगी ठेचण्यासाठी झाला असावा.या प्रज्ञावंत दाम्पत्याने ओळखले होते की बुरसटलेल्या समाजाला ताळयावर आणायचे असेल तर वाणीबरोबर लेखणी चालविली पाहिजे.सावित्रीबाई यांचा मुळ पिंड हा समाजसेविकेचा असल्याने त्यांनी सामाजिक अन्यायाला वाचा फोडली.परिणामी काव्याचे अंतरंग व बहिरंगात अनेक बदल घडून आलेले आहेत. त्यांच्या काव्याचा अभ्सरा करतांना जाणवते की, त्यांच्या कवितेने भूतकाळाशी नाते न तोडता भविष्यकाळाचा वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.ग्रामीण माणूस हा भारतीय समाजाचा केंद्रबिंदू आहे. उच्चभ्रू लोकांनी झिडकारलेला तलागळातील हा माणूस सावित्रीबाईंच्या काव्याचा अधिनायक आहे.त्यांच्या साहित्य कृतीत पुढील रचनांचा समावेश करावा लागतो.१ काव्यफुले,कवितासंग्रह इ.स.१८५४२जोतीरावांची भाषणे संपादक सावित्रीबाई फुल इ.स. १८५६,३जोतीरावास पत्रे,४बावन्नकशी सुबोध रत्नाकर १८९२ ,५मातुश्री सावित्रीबाईंची भाषणे इ.स. १८९२,६मानव आणि सृष्टी,जाईची फुले, आपल्या फुलपाखरु आणि फुलांची कळी' 'मातीची ओवी' **अश्या अनेक कविता,पत्र यांतून त्यांच्या प्रगाढ बुद्धीमत्तेची जाण होते.**[८(श्रीमती सरोज देशपांडे, स्त्रीभूषण सावित्रीबाई फुले,मुक्तरंग प्रकाशन)]

**सावित्रीबाई यांच्या कार्याचे आजच्या शिक्षण क्षेत्रात योगदान**

आजचे युग हे स्त्री मुक्तीचे युग म्हणून ओळखले जाते.संयुक्त राष्ट्संघटनेने १९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले.भारतात अनेक संघटनांनी स्त्री मुक्तीची कामे हाती घेतले.'मानव मुक्तीचे महान उद्दिष्ट डोळयासमोर ठेवून कार्य करणा—या फुले दाम्पयांना केवळ स्त्री मुक्ती ही व्याप्ती संकुचित वाटली असणार एवढेच.' पण प्रथमच एक स्वतंत्र व्यक्ती म्हणरून स्त्रीने जगावे कसे?याचा आदर्श सावित्रीबाईनी आपल्या उक्ती आणि कृतीतून तसेच लेखनातून समाजासमोर ठेवला. आजच्या युगात आजही सांवित्रीबाईचे विचार लागू पडतात. स्त्री पुरुष समानता,सर्वधर्मसमभाव,समता,बंधुता,वैज्ञानिक दृष्टीकोन,या सगळया मूल्यांचा विचार त्यांच्या कार्यातून व शैक्षणिक सामाजिक योगदानातून दिसून येते.

**निष्कर्ष**

१.सावित्रीबाई म्हणजे स्त्री मुक्ती आंदोलनाची गंगोत्री होत्या. त्यांनी शिक्षणाची गंगा सर्व स्त्री करीता मोकळी केली.

२.सावित्री म्हणजे हिदी स्त्रीची ज्ञानज्योत होय.जोतीरावांनी हिंदी स्त्रीची सारी बंधने तोडून टाकण्यास सुरुवात केली आणि सावित्रीने या कार्यात स्वत:स झोकून दिले.

३.सावित्री स्त्री शिक्षणाची अग्रदुती होत्या.

४.सावित्रीबाई ध्येयधुंद समाजशिक्षिका होत्या.

५.सावित्रीबाई समाजाच्या सरस्वती होत्या.

६.सावित्रीबाई शिक्षणाच्या माहेरघर व सात्विकतेचा आविष्कार होत्या.

**शिफारशी**

१.सावित्रीबाई यांनी केलेले शैक्षणिक सामाजिक कार्य लक्षात घेता आजही गावखेडयात किंबहुना शहरातही चालत हुंडाबळी,स्त्रीयावरचे अत्याचार यासाठी अजूनही ठोस पावले उचलणे गरजेचे वाटते.

२.उच्च शिक्षणाकडे आजही गावाकडल्या मुली मुलांच्या कल कमी दिसतो. आर्थिक विवंचना दिसून येते यासाठी योजना आखणे महत्वाचे ठरते.

३.स्त्रीयांना स्वयंम कृतीशील बनवण्याचे घडे दिले जावे.

**संदर्भग्रंथ सूची**

१.प्रा.रा.तु.भगत,स्त्री शिक्षणाचे शिल्पकार,चैतन्य प्रकाशन,कोल्हापूर

२.श्रीमती सरोज देशपांडे, स्त्रीभूषण सावित्रीबाई फुले,मुक्तरंग प्रकाशन,लातूर

३.सरोजिनी बाबर,'स्त्री शिक्षणची वाटचाल

४.भारती पाटील,आम्ही सावित्रीच्या लेकी

५.माळी मा.गो.आणि दतर संपा.'क्रातिज्योती सावित्रीबाई फुले :काळ आणि कर्तृत्व'महाराष्ट् राज्य साहित्य संस्कृती मंडळ ,मुंबई

६. https:marathi.webdunia.com./article'marathi-current-news/Savitribai-phule-jjayanti-2024

7.http://ugtworl.com/social-anf-educational-work-done-by-savitribai-phule-marathi-by-ugtworld